FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

0167747

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मु. पहिली खबर क्र. FIR No. 20 वर्ष Year 2020 दि. Date 09/11/2020

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ...... कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना Occurrence of offence वार Day सोमवार तारीख पासून Date from 08/11/2020 वेळ Time 18:50 तारीख पर्यंत Date to 9/11/2020 वेळ Time 13:10

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 07/11/2020 वेळ Time ......

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference Entry No 36 तारीख Date 9/11/2020 वेळ Time 23:50

4. माहितीचा प्रकार Type of Information लाच संदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. पायधुनी चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No पोलीस स्टेशनचे तिसरे माळ्यावर

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name पायधुनी पोलीस ठिकाणीचे नंबर No. if any स्टेशनचे गल्ली Ward तिसरे रस्त्याचे नाव Name of road माळ्यावर

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place पायधुनी गाव Village पोलीस पोस्ट Post स्टेशन, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant Permanent Address.

   (a) नाव Name श्री इलियाज अजीज खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अजीज खान

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 40 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality ...... फोन नं. Phone No. ......

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation ......

   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......

   (h) पत्ता Address 63 गल्ली / वार्ड नं. Ward गणेश मुर्ती घर / नाव नं. House/Name No. नगर, भाग फोन / मो. नं. Phone/Mo. No. 3 कफ पॅन नं. PAN No. परेड, मुंबई वोटर्स नं. Card No. ......

   रस्त्याचे नाव Road ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......

   तालुका Taluka ......, जिल्हा Dist ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   1) श्रीमती स्वप्नाली आसाराम जंगले, वय-32 वर्ष, धंदा पो उपनिरीक्षक नेमणूक- पायधुनी पोलीस स्टेशन, राहणार- प्लॉट नं. 455, रूम नं. 07, सेक्टर 22, उर्फे, रामतनू माता सरकारि रुग्णालय-च्या समोर, रामतनू माता ग्राऊन्ड, उर्फे, नवी मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

फिर्यादी यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद हस्तलिखीत केला असून तो या सोबत आहे. तीच यातील प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई.

फिर्याद दिनांक ०९/११/२०२०

श्री. ईलीयाझ अजीज खान, वय ४० वर्षे, धंदा – केबल टिव्ही व इंटरनेट रा.ठी. ६३७, गणेश मुर्ती नगर, भाग ३, कफ परेड, मुंबई ०५ मो.नं. ९८२११११७८६

———०००———

मी वर नमूदप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी आई शहनाझ खान वय ६५ वर्षे, पत्नी सायरा खान वय ३२ वर्षे, तीन मुले यांचे सह रहात आहे. माझे वडील नामे अजीज खान यांचे निधन झाले असुन माझे रहाते गाव पो. गुरुवार पेठ, पुणे, राज्य महाराष्ट येथे आहे. माझे शिक्षण ७ वी पर्यन्त शिक्षण मुंबई मध्ये झालेले आहे. मी सन २०१२ पासुन कुलाबा कफ परेड विभागात केबल टिव्ही व इंटरनेटचा व्यवसाय करतो. त्यावर मी माझा उदरनिर्वाह करत आहे.

मी केबल टीव्ही ऑपरेटर म्हणून काम करतो. माझे इसम नामे सोनु पठाण व रियाज शेख उर्फ रियाज चाचु यांच्या सोबत ते ड्रग्सचा धंदा करीत असल्याबाबत मी त्याबाबत पोलिसांना माहिती देतो म्हणून त्यांनी माझ्यावर संशय घेवुन मला खबरी संबोधुन, मला शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली होती त्याबाबत मी पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे जावून दिनांक ३१/१०/२०२० रोजी तक्रार केली असता, तेथील महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती स्वप्नाली जंगले यांनी गुन्हा रजि.नं. ३५२/२०२० कलम ३२४, ५०४, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला.

पायधुनी पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती स्वप्नाली जंगले यांनी सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्याकरीता तसेच त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरीता त्यानी मला दिनांक ०७/११/२०२० रोजी पोलिस ठाण्यात बोलावुन त्यानी त्याचे स्वत:चे दोन्ही हात समोर धरुन मला त्यांची दहाही बोटे दिसतील अशा प्रकारे त्यांनी त्याचे दोन हात दाखविले व "मला उदेशुन, दस लाके दे" अशा प्रकारे त्यांनी माझ्याकडे रु. १०,०००/– रक्कमेच्या लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांच्याकडे विचारणा केली असता "केस स्ट्रॉग बनाना है, तो उतना देना पडेगा" असे उत्तर दिले. माझी काहिही चुक नसतांना व मिच त्या गुन्हयाचा फिर्यादी असल्याने सदरची रक्कम पिएसआय स्वप्नाली जंगले यांना दयावयाची माझी ईच्छा नसल्याने मी दि.०७/११/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार अर्ज सादर केला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स.पो.आ. कालेकर व पो.नि. साधना इंगळे यांनी त्यांच्या वरीष्ठांना माझ्या तक्रारीबाबत अवगत केले. पो.नि. साधना इंगळे व सपोआ कालेकर यांनी मला दि.०८/११/२०२० रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या पडताळणीकामी ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयास बोलविले.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मी दि.०८/११/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाच्या पो.नि. साधना इंगळे, स.पो.आ. कालेकर यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. साधना इंगळे यांनी मी दि.०७/११/२०२० रोजी पीएसआय जंगले यांनी केलेल्या लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारीची लगेच पडताळणी करण्याबाबत माझेकडे विचारणा केली मी होकार देवुन पो.नि. साधना इंगळे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी कारवाई घेण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच सदर पडताळणीच्यावेळी जंगले मॅडम व माझेमधील संभाषण हे माझे बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येवुन ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांनी पीएसआय श्रीमती स्वप्नाली जंगले यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भातील कारवाई सुरु

केली. त्याप्रमाणे मी, दोन पंच, व पडताळणीपथकासह सरकारी वाहनातून बॉम्बे हॉस्पिटल पर्यंत गेलो. तत्पुर्वी एसीबी ऑफीस वरळी येथून आम्ही निघण्यापुर्वी माझे सोबत तेथे आलेला माझा मित्र नामे सुरेश खटकाळे यास आमच्या गाडीचे मागून माझी एक्टीव्हा स्कुटर घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो आमच्या मागे बॉम्बे हॉस्पिटल पर्यंत आला. त्याठिकाणी आम्ही सरकारी वाहन उभे केले व आम्हाला इंगळे मॅडम यांनी सुचना केल्याप्रमाणे मी व पंच सुनिल बाळु पाडेकर असे दोघे माझे एक्टीव्हा मोटार वाहनावरुन पायधुनी पोलीस ठाणेस गेलो. तेथे गेल्यानंतर मी पीएसआय स्वप्नाली जंगले यांना पायधुणी पोलीस ठाणे, मुंबई कार्यालयातील अधिकारी कक्षामध्ये जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी माझा गुन्हयाबाबत चर्चा केली असता मी दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपीतास अटक करण्याकरीता, गुन्हयाचा चांगला तपास करण्याकरीता रु. १०,०००/– रक्कमेची मागणी केली. परंतु इतकी रक्कम माझेकडे नसल्याचे मी त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी 'हाफ कर दो' असे सांगितले. म्हणुन मी त्याना ''पाच हजार का?'' असे विचारले. त्यावर त्यांनी मान हलवुन मुक संमती दिली. त्यावर मी त्याना सदरची रक्कम लगेच घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर मी त्यांच्या कार्यालयातुन बाहेर पडताना त्यांनी मला पुन्हा त्यांच्या हाताची दहा बोटे दाखवून दहाचा इशारा केला. त्यानंतर मी पंचासह परत सरकारी वाहनाजवळ येवून तेथे सपोआ कालेकर व पो.नि. साधना इंगळे यांना पीएसआय स्वप्नाली जंगले यांनी रु. ५०००/– रक्कमेची मागणी केल्याचे परंतू हाताची दहा बोटे दाखविल्याचे सांगितले. सपोआ कालेकर व पो.नि. साधना इंगळे यांनी पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियानला लावलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण सरकारी वाहनामध्ये बसून पंचासमक्ष ऐकले. त्यावेळी लाचेच्या मागणीबाबत खात्री झाल्यावर मी पुन्हा श्रीमती स्वप्नाली जंगले यांना फोन केला असता त्यांनी त्या पोलीस स्टेशनवरुन निघाल्याचे सांगितल्याने आम्ही दुसऱ्या दिवशी दि. ०९/११/२०२० रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही वरळी येथील ला.प्र.वि., कार्यालयास आलो.

मी आज रोजी सकाळी १०.०० वा. सपोआ कालेकर व पो.नि. साधना इंगळे यांचे समक्ष हजर झालो. लाचेच्या रक्कमेकामी माझेकडे बचतीमधील रु. १०,०००/– इतकी शिल्लक असलेली रक्कम पो.नि. साधना इंगळे यांना सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी दिले. सदरच्या रक्कमेस पोलीस अंमलदार निंबाळकर यांनी ला.प्र.वि. कार्यालयातील कक्षामध्ये अॅन्थॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेंवली. त्यानंतर पो.नि. साधना इंगळे यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच मला पीएसआय श्रीमती स्वप्नाली जंगले यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर इशारा म्हणुन सापळा पथकातील अधिकारी स.पो.आ. कालेकर यांना त्यांच्या मोबाईलवर मिस कॉल देण्यास सांगितले. त्यांनतर आम्ही सर्व सरकारी वाहनाने रवाना झालो व पायधुनी पोलीस स्टेशन पासून काही अंतरावर गाडी थांबविल्यानंतर मला सरकारी वाहनामध्ये पो.ह. पालांडे यांचे मदतीने पोनि इंगळे मॅडम यांचे सांगण्यावरुन शर्टच्या आतमधील बनीयनला व्हॉईस रेकॉर्ड लावण्यात आला. त्यांनतर मी व पंच सुनिल पाडेकर असे पीएसआय श्रीमती स्वप्नाली जंगले यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात चालत गेलो. त्यावेळी पायधुनी पोलीस ठाणेच्या आजु बाजूस सापळा पथक ठरल्याप्रमाणे हजर झाले. आम्ही पीएसआय स्वप्नाली जंगले यांच्या तीसऱ्या मजल्यावरील अधिकारी कक्षाजवळ आलो असता त्या अधिकारी कक्षाच्या बाहेरच युनिफॉर्ममध्ये उभ्या होत्या. त्यांनी आम्हाला पाहून माझ्या सोबत असणारे पंचाबाबत विचारणा केली व त्यांना बाहेर थांबण्यास सांगितले. तेव्हा पंच सुनिल पाडेकर हे अधिकारी कक्षाच्या दरवाज्याजवळच थांबले. त्यानंतर मी व पीएसआय स्वप्नाली जंगले यांच्या टेबला जवळ जावुन त्यांच्या समोर बसलो. त्या देखील त्यांच्या खुर्चीवर बसल्या. त्यावेळी त्या अधिकारीकक्षात आणखी एक अधिकारी युनीफॉर्मवर त्यांचे काम करत बसलेले होते. म्हणून पीएसआय स्वप्नाली जंगले यांनी माझेकडे हाताने पैश्याबाबत विचारणा केली.

पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई

त्यावर मी 'दस लाया है' असे सांगितले त्यावर त्यांनी ' किधर है? ' अशी विचारणा केल्यावर मी शर्टाच्या खिश्यास हात लावला. त्यावर त्यांनी हाताच्या इशा–याने पैसे मागीतले. तेव्हा मी शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढली असता, पीएसआय स्वप्नाली जंगले यांनी टेबलाच्या खाली उजवा हात घालुन रक्कम देण्यास सांगितली. तेव्हा मी रु.१०,०००/– लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने टेबलाखालून स्वप्नाली जंगले यांचेकडे दिली. त्यानी लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजूस असलेल्या खिश्यात ठेवली. त्यावर मी पुर्व नियोजीत इशारा म्हणुन सपोआ कालेकर याचे मो.न. ९८७०१०७९६५ वर मिस कॉल दिला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार व महिला अंमलदार यांनी त्या ठिकाणी अधिकारी कक्षात येवून पीएसआय स्वप्नाली जंगले यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

दि. ०८/११/२०२० रोजीच्या पडताळणी व दि.०९/११/२०२० रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान पीएसआय स्वप्नाली जंगले यांचेशी माझे झालेले संभाषण त्या त्या वेळी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आलेले आहे. सदर ध्वनिमुद्रीत संभाषण पो.नि. साधना इंगळे यांनी मला ऐकवून माझे मदतीने पोलीस अंमलदार पालांडे यांच्या मार्फतीने त्याची प्रतिलिपी संगणकावर तयार केली. माझे व पीएसआय स्वप्नाली जंगले यांचेमध्ये झालेले संभाषण ओळखुन त्याबाबत पोलीस अंमलदार पालांडे यांना दिलेल्या माहितीवरुन श्री पालांडे यांनी संभाषणाबाबत तशी नोंद घेतली आहे.

पीएसआय स्वप्नाली जंगले यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी पीएसआय स्वप्नाली जंगले यांनी मी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपीतास अटक करण्याकरीता व गुन्हयाचा तपास योग्य करण्याचा मोबदला म्हणुन माझेकडे दि. ०८/११/२०२० रोजी रु. १००००/– इतक्या रक्कमेची मागणी करुन रु. १०,०००/– रक्कम लाच म्हणून स्विकारली म्हणुन माझी पीएसआय स्वप्नाली जंगले यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगितल्याप्रमाणे घडलेल्या घटनांप्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

( साधना इंगळे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ (विलंबाचे कारण नाही.)

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) Detail write down back blank page

यावेळ नमूद ता. वे. व ठिकाणी फिर्यादी यांनी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपीलास अटक करण्याकरीता व गुन्ह्याचा तपास योग्य करण्याचा मोबदला म्हणून फिर्यादी यांच्याकडे दि. 08/11/2020 रोजी रु. 10,000/- इतक्या रक्कमेची मागणी करून रु. 10,000/- रोख लाचेची रक्कम कोणत्याही कायदेशीर पारिश्रमा खेरीज स्वतःच्या फायद्याकरीता स्विकारली व सदर लाचेची रक्कम माहित असून स्वतःच्या पॅन्टच्या खिश्यात ठेवून आलेले स्वप्नाली जंगले यांच्या विरुद्ध कलम

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले कलम 7, भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो. नि. साधना म. इंगळे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) साधना इंगळे Rank पो. निरीक्षक No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......................... (3) Transferred to P. S. ..........................

District.......................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

9/11/2020

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name साधना इंगळे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Code No. of I. O.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report